# अदानीच्या एईएमएलच्या कर्मचाऱ्यांचे स्वच्छ भारत अभियान

**मुंबई :** अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडने यंदाच्या गणेश चतुर्थीचा उत्सव साजरा करण्यासाठी वेगळे निमित्त शोधले आहे. भारत सरकारच्या स्वच्छ भारत अभियानानुसार कंपनीचे कर्मचारी स्वच्छता ही सेवा या चळवळीत योगदान देण्याची शपथ ग्रहण करून साजरा करत आहेत. या चळवळीत मीरा भाईंदर विभागातील कर्मचाऱ्यांनी स्वच्छतेची कास धरून महात्मा गांधी यांच्या १५०व्या जन्मदिनानिमित्त आदरांजली वाहिली आहे.



या दोन आठवडे चालणाऱ्या देशव्यापी मोहिमेला पाठबळ म्हणून एईएमएलचे कर्मचारी हे मुंबई शहरातील वेगवेगळ्या ठिकाणांवरील एईएमएल कार्यालयाच्या परिसरातील रस्त्यांच्या स्वच्छतेच्या कार्यात सहभागी होणार आहेत. जवळपास २५०० कर्मचारी हे वेगवेगळ्या पथकांतर्गत काम करतील, ज्या कार्यालयांतर्गत व बाहेर फेकलेल्या कचऱ्यासह आजूबाजूच्या परिसरात कचरा एकत्र करणार आहेत. या मोहिमेच्या पहिल्या टप्प्याची सुरुवात एईएमएलच्या १५०० कर्मचाऱ्यांसह शनिवारपासून करण्यात आली आहे. तर मंगळवार सकाळपासून मीरा भाईंदर विभागातील कर्मचाऱ्यांनी मंगळवारी सकाळी मीरा भाईंदर परिसरात तसेच आसपास परिसरातील एईएमएल कार्यालयाजवळील क्षेत्रे स्वच्छ केली.

याबाबत एईएमएलच्या प्रवक्त्यांनी सांगितले की, राष्ट्र निर्माणाचे ब्रिद जपत आम्ही राष्ट्रीय निष्ठेच्या महत्त्वाच्या विषयांशी जुळवून घेत आलो आहोत. या उपक्रमाद्वारे एईएमएलचे कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय चळवळींसाठी त्यांचे योगदान देण्याचा निर्धार अधोरेखित केला आहे. पुढील दोन आठवडे अदानी इलेक्ट्रिसिटीचे कर्मचारी शहराच्या विविध भागांतून कचरा गोळा करणार आहेत.

## कर्मचाऱ्यांचे पथक तलावांशेजारी

या व्यापक मोहिमेंतर्गत मुंबईतील गणपती विसर्जन स्थळांनाही सामावून घेतले जाणार असून, विसर्जनाच्या दिवशी तलावांच्या ठिकाणी कर्मचाऱ्यांचे पथक तलावांशेजारी तैनात केले जाणार आहे. प्रत्येक उत्सव साजरा करताना, जबाबदाऱ्यांचे पालन करताना नागरिकांना सजग करणे हा या मोहिमेमागील उद्देश आहे.